Navgan Shikshan Sanstha Rajuri's

VASANTDADA PATIL ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, PATODA, DIST. BEED.

Department of Economics

दि. 10/08/2026

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की 15 ऑगस्ट 2026 रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने "अर्थांकन" या भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे त्याकरिता विद्यार्थ्यांनी आर्थिक घटना, आर्थिक घटकावरील साहित्य, लेख दिनांक 12 ऑगस्ट 2026 पूर्वी अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक बोंडगे एस.जी. व सहाय्यक प्राध्यापक श्रीमती इंगळे एस.व्ही यांच्याकडे जमा करावेत.

प्राचार्य

Principal
Vasantdada Patil Arts,Comm.
& Sci.College,Patoda,Dist.Beed.

Navgan Shikshan Sanstha Rajuri's

VASANTDADA PATIL ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, PATODA, DIST. BEED.

Department of Economics

Wall poster Inauguration Report

Date: 15 August 2026

The Department of Economics is functioning in the college under the guidance of the Hon. Principal Prof. Dr. Rakh B.V.

On behalf of the Department of Economics, on August 15, 2026, the wall poster 'Arthaankan' was inaugurated by the chief guest of the flag hosting ceremony, H.B.P. Shri Randhave Maharaj (Bapu), and the college's Hon. Principal, Prof. Dr. B.V. Rakh Sir. The students were guided in preparing this wall magazine by the Head of the Economics Department, Dr. Bondge S. G., Asst. Prof. Mrs. Ingle S.V. and Prof. Shri Pintu Rode Sir.

The 'Arthaankan' wall poster includes articles by students on topics such as: Indian agriculture, Indian unemployment, last 10 year yearly average trend in gold rate, natural resources and economic development, food security in India, causes of low productivity in agriculture and currency expenditure rate in India.

The editorial board for this wall poster consisted of students Kajale Sagar Tuljiram ,Kolpe Bhushan Govardhan, Shinde Puja Ganesh,Sayyad Sadiq Sameer and Jaybhaye Ritesh Santosh.

Department of Economics

For

Principal

Principal
Vasantdada Patil Arts,Comm.
& Sci.College,Patoda,Dist.Beed.

Wall Poster Inagration Aug.15,2026

चंपावतीपत्र
epaper.champavateepatra.in
Page 6 - 17 Aug 2026

...थ्यांनी देशभक्तीपर वातावरणात ...ग्रा उत्सव साजरा केला.

उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात पार पडला.

क्रमांक मिळवलेल्या शुभम चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, एन.सी. सी. विद्य... मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसंतदादा पाटील महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजर...

पाटोदा । वार्ताहर

दि.१५ ऑगस्ट रोजी येथील नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.)संचलित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे स्थानिक सदस्य ह. भ.प. रामकृष्ण रंधवे बापू तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम राख सर अध्यक्ष म्हणून लाभले होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अभय क्षीरसागर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अनिल जोगदंड, पदव्युत्तर विभागाचे संचालक प्रा. डॉ.गणेश पाचकोरे, पर्यवेक्षक प्राध्यापक दयानंद सरपते, कार्यालयीन अधीक्षक श्री चंद्रकांत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू



यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख अतिथी ह भ प रामकृष्ण रंधवे बापू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी लगेचच ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत गाण्यात आले. त्यानंतर प्रा. डॉ. सोनाजी गायकवाड यांनी प्रास्ताविकात आजच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे ह भ प रंधवे बापूंनी आपल्या मनोगतावेळी उपस्थित सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन, " पंधरा ऑगस्ट हा दिवस सर्व भारतीयांनी राष्ट्रीय सण म्हणून उत्स्फूर्तपणे साजरा करावा आणि राष्ट्रीय भावना तेवत ठेवावी" अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात विविध कलाप्रकार सादर केले. या कार्यक्रमात एक छोटीशी नाटिका सादर करून शेतकऱ्यांच्या कर्ज बाजारीपणावर प्रकाश टाकण्यात आला. हा कार्यक्रम संपल्यानंतर लगेच महाविद्यालयातील विविध विभागांतर्गत तयार करण्यात आलेल्या भितीपत्रकांचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर महिला बाल कल्याण आयुक्तालयात मार्फत महिला सक्षमीकरणाविषयीची प्रतिज्ञा आणि राष्ट्रीय तंबाखू निवारण उपक्रमा अंतर्गत तंबाखू मुक्तीची शपथ उपस्थित सर्वांनी सामूहिक रितीने घेतली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम राख सर यांनी आपल्या मनोगतातून प्रथम उपस्थित सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. "भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले. आजच्या तरुणांनी या हुतात्म्यांच्या बलिदानाची जाणीव ठेवून राष्ट्राची सेवा केली पाहिजे, तिरंग्याचा शान राखली पाहिजे, आणि स्वतःच्या विकासाबरोबरच आपला गाव,राज्य आणि देशाचा विकास होण्यास हातभार लावला पाहिजे."

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. विनोद पवार, डॉ. तानाजी आगळे व सांस्कृतिक विभागामार्फत करण्यात आली होते. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचलन डॉ. सोनाजी गायकवाड, डॉ. देवानंद पुरी आणि प्राध्यापि... कावेरी खुरणे यांनी केले. तर प्रति... आणि व्यसनमुक्तीच्या शपथे... वाचन डॉ. जालिंदर लोणके य... केले. या कार्यक्रमाचा समारोप ... डॉ. काकासाहेब पोकळे यांनी ... उपस्थितांचे आभार मानून व्य... केला. या कार्यक्रमाला यशस... करण्यासाठी प्राध्यापक विठ्ठल ... प्राध्यापिका ज्योती राडक... प्राध्यापिका वैशाली कार्श... प्राध्यापिका विमल आला... इत्यादींनी परिश्रम घेतले. ... कार्यक्रमाचे छायाचित्रण करण्या... महत्त्वाची कामगिरी प्राध्याप... प्रदीप मांजरे, प्राध्यापक चंद्रशे... बनसोडे,प्राध्यापक गोकुळ कंठ... आणि प्राध्यापक दिनेश राऊत य... बजावली. या कार्यक्रमा... महाविद्यालयातील सर्व प्राध्याप... कार्यालयीन कर्मचारी आ... विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थि... होते.

...कॉलेज ऑफ ...